GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 2
March - April: 2026

# महाराष्ट्रारतील राज्य कामगार विमा योजनेचा विश्लेषणात्मक अभ्यास

**दत्तु पोपट झेंडे**
संशोधक विद्यार्थी
तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, पुणे
**इमेल :** rajdattazende@gmail.com
**डॉ. समाधान पाटील**
मार्गदर्शक
अर्थशास्त्र विभाग प्रमुख-तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय, बारामती, पुणे.
**इमेल :** sk.patil@tccollege.org
**डॉ. बी. जी. लोबो**
सहमार्गदर्शक
प्रभारी प्राचार्य - अनंतराव पवार महाविद्यालय, पिरंगुट, पुणे.
**इमेल :** lobobgeco@gmail.com

## गोषवारा

सामाजिक सुरक्षा ही कल्याणकारी राज्यव्यवस्थेचा एक महत्त्वपूर्ण आधारस्तंभ असून कामगारांच्या आर्थिक, सामाजिक व आरोग्यविषयक संरक्षणासाठी तिची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. कर्मचारी राज्य विमा अधिनियम , १९४८ अंतर्गत राबविण्यात येणारी कर्मचारी राज्य विमा योजना ही संघटित क्षेत्रातील कामगारांसाठी सर्वाधिक प्रभावी सामाजिक विमा योजना मानली जाते. महाराष्ट्र हे देशातील अग्रगण्य औद्योगिक राज्य असल्यामुळे येथे कर्मचारी राज्य विमा योजनेचा लाभ घेणाऱ्या कामगारंची संख्या मोठी आहे. औद्यागिकीकरण, शहरीकरण आणि संघटित रोजगाराच्या विस्तारामुळे या योजनेचे महत्व अधिक वाढले आहे. प्रस्तुत संशोधनाचा उद्देश महाराष्ट्रातील राज्य कामगार विमा योजनेचा विश्लेषणात्मक अभ्यास करणे हा आहे. तसेच योजनेची परिणामकारकता वाढविण्यासाठी आवश्यक उपाययोजना मांडण्याचाही प्रयत्न या अभ्यासातून करण्यात आला आहे. हा अभ्यास सामाजिक सुरक्षा व्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी तसेच कामगार कल्याणाच्या दृष्टीने उपयुक्त ठरेल.

**मुख्य शब्द (Key words) :**

सामाजिक सुरक्षा, महाराष्ट्रातील राज्य कामगार विमा योजना, वैद्यकीय लाभांचे विश्लेषण, दरडोई खर्च

GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 2
March - April: 2026

**प्रस्तावना :**

भारतात सामाजिक सुरक्षेचा विकास स्वातंत्र्यपूर्व काळापासून सुरू झाला असला तरी स्वातंत्र्यानंतर विविध कायदे, योजना आणि धोरणांच्या माध्यमातून त्याला अधिक व्यापक स्वरूप प्राप्त झाले. कामगारांच्या हिताचे संरक्षण, आरोग्य सुविधा, आर्थिक सहाय्य आणि सामाजिक न्याय या वर्गाच्या वाढत्या गरजांमुळे सामाजिक सुरक्षा व्यवस्थेला विशेष महत्त्व प्राप्त झाले. सामाजिक सुरक्षा ही आधुनिक कल्याणकारी राज्यव्यवस्थेचा एक महत्त्वपूर्ण आधारस्तंभ मानली जाते.[१]

भारतात कामगारांच्या सामाजिक संरक्षणासाठी विविध कायदे व योजना कार्यरत आहेत. इतर कामगार कल्याणविषयक कायद्यांबरोबरच कर्मचारी राज्य विमा अधिनियम, १९४८ अंतर्गत राबविण्यात येणारी 'कर्मचारी राज्य विमा योजना' ही देशातील सर्वात महत्त्वाची सामाजिक विमा योजना मानली जाते. या योजनेद्वारे पात्र कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांना वैद्यकीय सेवा, आजारपण भत्ता, मातृत्व लाभ, अपंगत्व लाभ, आश्रित लाभ तसेच इतर
सामाजिक सुरक्षा विविध उपलब्ध करून दिल्या जातात.

महाराष्ट्र हे भारतातील अग्रगण्य औद्योगिक राज्य असल्यामुळे येथे कर्मचारी राज्य विमा योजनेचे लाभार्थी मोठ्या प्रमाणावर आहेत. औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि वाढत्या संघटित रोजगारामुळे या योजनेचे महत्त्व अधिक वाढले आहे.

**राज्य कामगार विमा योजना :**

कर्मचारी राज्य विमा योजना ही जिथे १० किंवा त्याहून जास्त कमागार काम करतात अशा कारखाने आणि इतर आस्थापनांना लागू होते. उदा. रस्ते व वाहतूक, हॉटेल्स, रेस्टॉरंट, सिनेमागृहे, वृत्तपत्रे, दुकाने, खाजगी शिक्षण संस्था इत्यादी ठिकाणी ही योजना लागू आहे. कारखाने तसेच आस्थापनांमधील ज्या कामगारांचे मासिक वेतन रु.२१,००० पर्यंत आहे ते ईएसआय योजनेच्या कक्षेत येतात. या योजनेअंतर्गत कर्मचाऱ्यांच्या देय वेतनाच्या ०.७५ टक्के रक्कम कर्मचाऱ्यांच्या योगदान म्हणून पगारातून कपात केली जाते, तर नियोक्ता संबंधित कर्मचाऱ्याच्या देय वेतनाच्या ३.२५ टक्के योगदान भरतो. दैनंदिन मजूरी म्हणून रु. १७६ पेक्षा कमी उत्पन्न मिळवणाऱ्या कामगारांना त्यांच्या योगदानातून सूट देण्यात आलेली आहे.[२]

GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 2
March - April: 2026

**ईएसआय योजनेच्या लाभांचे सविस्तर विश्लेषण :**

कर्मचारी राज्य विमा कायदा, १९४८ हा भारतीय कामगार कायद्यातील एक मैलाचा दगड आहे. कामगारांच्या त्यांच्या सेवाकाळात उद्भवणाऱ्या विविध सामाजिक, आर्थिक व आरोग्यविषयक संकटापासून संरक्षण देणे हा या कायद्याचा मुख्य उद्देश आहे. कायद्यातील कलम ४६ अंतर्गत कामगारांना आणि त्यांच्या कुटुंबाला सहा मुख्य सामाजिक सुरक्षा लाभ आणि सात गरजेवर आधारित सवलती प्रदान करण्यात आल्या आहेत. राज्य कामगार विमा योजनेअंतर्गत विमाधारक व्यक्ती आणि त्यांच्या कुटुंबियांना योजनेअंतर्गत मोफत आणि व्यापक वैद्यकीय सेवेसह रोख लाभ मिळण्याचा अधिकार आहे. या योजनेअंतर्गत मिळणारे लाभ पुढीलप्रमाणे:[३]

**१) आजारपणाचा लाभ :** कर्मचारी कामावर अनुपस्थित असताना प्रमाणित आजाराच्या काळात विमाधारक व्यक्तीला वेळोवेळी रोख रक्कम दिली जाते. त्याला आजारपणाचा लाभ म्हणतात. याचे तीन प्रकार आहेत.

अ)आजारपणाचा लाभ : योगदान कालावधीमध्ये ७८ दिवसांचे योगदान भरलेल्या विमाधारकाला दैनंदिन वेतनाच्या ७०% दराने सलग दोन हितलाभ कालावधीमध्ये ९१ दिवसांपर्यंत आजारपणाचा लाभ मिळतो.

ब) विस्तारित आजारपणाचा लाभ : सलग चार कालावधीत १५६ दिवसांच्या योगदानासह दोन वर्षासाठी सतत विमापात्र रोजगार असणाऱ्या विमाधारक व्यक्तीला ३४ निर्दिष्ट दिर्घकालीन आजारासाठी सरासरी दैनंदिन वेतनाच्या ८०% दराने १२४ दिवसापासून दोन वर्षापर्यंत विस्तारीत आजारपणाचा लाभ मिळतो.

क) वर्धित आजारपणाचा लाभ : सलग्न योगदान कालावधीत ७८ दिवसांचे योगदान भरलेल्या विमाधारक व्यक्तीला सरासरी देय वेतनाच्या १००% दराने महिला नसबंदीसाठी १४ दिवस व पुरुष नसबंदीसाठी ७ दिवस वर्धित आजारपणाचा लाभ मिळतो.

**२) अपंगत्वाचा लाभ :**

अ) तात्पुरते अपंगत्वाचा लाभ : विमापात्र रोजगारात प्रवेश केल्याच्या पहिल्या दिवसापासून सरासरी देय वेतनाच्या ९०% दराने तात्पुरते अपंगत्व असेपर्यंत अपंगत्वाचा लाभ दिला जातो.

ब) कायम स्वरूपी अपंगत्वाचा लाभ : विमापात्र रोजगारात प्रवेश केल्याचा पहिल्या दिवसापासून सरासरी दैनंदिन वेतनाचा ९०% दराने वैद्यकीय मंडळाने निर्धारित केल्यानुसार संपूर्ण आयुष्यासाठी किंवा अपंगत्व असेपर्यंत दिला जातो.

**३) मातृत्व लाभ :** देय योगदान अवधीमध्ये ७० दिवसांचे योगदान दिलेल्या महिला विमाधारकाला सरासरी दैनंदिन वेतनाच्या १००% दराने प्रसूती असल्यास २६ आठवडे व गर्भपात झाल्यास ६ आठवडेपर्यंत मातृत्वाचा लाभ मिळतो.

**४) अवलंबित्वाचा लाभ :** रोजगारातून प्रवेश केल्याच्या पहिल्या दिवसापासून रोजगारात दुखापतीमुळे विमाधारकाचा मृत्यू झाल्यास वेतनाचा ९०% दराने विधवेच्या आयुष्यासाठी किंवा पुर्नविवाह पर्यत विमाधारकाच्या विधवा पत्नीला/अवलंबित्वाला अटीनुसार अवलंबित्वाचा लाभ दिला जातो.

**५) वैद्यकीय लाभ :** विमापात्र रोजगारात प्रवेश केल्याच्या पहिला दिवसापासून विमाधारक व्यक्ती व त्यांच्या कुटुंबियांना मोफत वैद्यकीय सेवा दिली जाते. यासाठी कोणत्याही खर्चाची मर्यादा नाही.

**६) इतर लाभ :**

१) प्रसूती खर्च : विमाकृत महिला व्यक्ती किंवा विमाकृत व्यक्तीच्या पतीला जर प्रसूतीसाठी याजेनेच्या वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसतील तर केवळ दोन प्रसूतीपर्यंत एक रक्कमी ७५०० रुपये प्रसूती खर्च दिला जातो.

२) सेवानिवृत्तीनंतर लाभ : विमाधारक व्यक्ती व जोडीदारासाठी वार्षिक १२० रुपये योगदान भरून अटीसह वैद्यकीय लाभ घेऊ शकतात.

३) अत्यंविधी खर्च : रोजगारात प्रवेश केल्याच्या पहिल्या दिवसापासून विमाकृत व्यक्तीचा सेवाकाळात मृत्यू झाल्यास अंत्यसंस्काराच्या वेळी झालेला वास्तविक खर्च किंवा कमाल १५००० रुपये अत्यंविधी खर्च म्हणून दिला जातो.

४) राजीव गांधी श्रमिक कल्याण योजना : कमीत कमी ३ वर्ष योगदान भरलेल्या विमाधारक व्यक्तीला कारखाना बंद पडल्यामुळे/कामगार कपातीमुळे/कायमस्वरूपी अपंगत्व किंवा अनैच्छिक कारणामुळे नोकरी गेल्यास वेतनाच्या ५०% दराने आयुष्यात एकदाच २४ महिन्यापर्यंत बेरोजगारीचा भत्ता दिला जातो.

५) व्यावसायिक प्रशिक्षण : रोजगारात दुखापतीमुळे आलेल्या शारीरिक अपंगत्वाच्या परिस्थितीमध्ये व्यवसाय प्रशिक्षण चालू असेपर्यंत रुपये १२३ दररोज किंवा जो अधिक असेल
तो व्यावसायिक प्रशिक्षण भत्ता दिला जातो.

६) शारीरिक पुर्नवसन : नोकरीतील दुखापतीमुळे आलेल्या शारीरिक अपंगत्वाच्या परिस्थितीमध्ये सरासरी दैनंदिन वेतनाच्या १००% दराने कृत्रिम अंग किंवा केंद्रात दाखल असेपर्यंत शारीरिक पुर्नवसन भत्ता दिला जातो.

७) अटल बिमित व्यक्ती कल्याण योजना : विमाधारक व्यक्तींची अचानक नोकरी गेल्यास एक वर्ष योगदान दिल्यास सरासरी दैनंदिन वेतनाच्या ५०% दराने ६० दिवसापर्यंत बेरोजगरीचा लाभ दिला जातो.

**संशोधन विषयाची निवड :**

''महाराष्ट्रातील राज्य कामगार विमा योजनेचा विश्लेषणात्मक अभ्यास'' या संशोधनाचा उद्देश राज्यातील कर्मचारी राज्य विमा योजनेची सद्यस्थिती, लाभार्थ्यांना मिळणारा वैद्यकीय लाभ, सुविधा, सुविधांची गुणवत्ता, दरडोई खर्च यांचा वस्तुनिष्ठ अभ्यास करणे हा आहे. सामाजिक सुरक्षा व्यवस्था अधिक प्रभावी, सर्वसमावेशक आणि लोकाभिमुख करण्यासाठी हे संशोधन महत्त्वपूर्ण योगदान देईल.

सामाजिक सुरक्षांच्या दृष्टीने राज्य कामगार विमा योजनेचा अभ्यास कमी झाल्याचे दिसून येते. ही उणीव भरून काढण्याचा प्रयत्न हा अभ्यासामध्ये करण्यात आलेला आहे. सर्व बाबींचा सखोल अभ्यास करण्यासाठी हा विषय निवडण्यात आला आहे.

**संशोधन विषयाचे महत्त्व :**

राज्य कामगार विमा योजना ही कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करणाऱ्या भारतातील महत्त्वाच्या योजनांपैकी एक आहे. या योजनेद्वारे कामगारांना वैद्यकीय उपचार, आजारपण भत्ता, मातृत्व लाभ, अपघात भरपाई तसेच इतर आर्थिक व सामाजिक संरक्षण उपलब्ध करून दिले जाते. महाराष्ट्र हे देशातील प्रमुख औद्योगिक राज्य असल्यामुळे येथे या योजनेचे लाभार्थी मोठ्या संख्येने आहेत.

सामाजिक सुरक्षा व्यवस्था अधिक प्रभावी, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी हे संशोधन महत्त्वपूर्ण योगदान देऊ शकते.

**संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये :**

१) राज्य कामगार विमा योजनेअंतर्गत उपलब्ध विविध लाभ व सेवांचे विश्लेषण करणे.

२) राज्य कामगार विमा योजनेअंतर्गत लाभार्थी कामगारांमध्ये योजनेबाबत असलेल्या जागरूकतेचा अभ्यास करणे.

**ईएसआयसी योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील नियोक्ते, कर्मचारी, विमाधारक, लाभार्थी यांची आकडेवारी :**

महाराष्ट्र राज्यातील कर्मचारी राज्य विमा महामंडळाचे प्रादेशिक कार्यालय मुंबई येथे असून मरोल, ठाणे, पुणे, मुंबई, छत्रपती संभाजीनगर, नागपूर व नाशिक येथे उप-प्रादेशिक कार्यालये आहेत. सन २०१४-१५ ते २०२३-२४ या कालावधीतील नोंदणीकृत नियोक्ते, कर्मचारी, विमाधारक व्यक्ती व लाभार्थी यांच्या आकडेवारीवरून महाराष्ट्रातील ईएसआयसी योजनेचा विस्तार, कामगारांचा सहभाग आणि सामाजिक सुरक्षा लाभांची व्याप्ती स्पष्ट होते. प्रस्तुत तक्त्यामध्ये या कालावधीतील वर्षनिहाय आकडेवारी सादर करण्यात आली आहे. ती पुढीलप्रमाणे : [४]

**तक्ता क्र. १ ईएसआयसी योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील आकडेवारी (२०१४-१५ ते २०२३-२४)**

| ईएसआयसी महाराष्ट्र | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | वर्ष | नियोक्ते | कर्मचारी | विमाधारक | लाभार्थी |
| १ | २०१४-१५ | १०३४९९ | २०५२४९० | २३५१८६० | ९१२५२१६ |
| २ | २०१५-१६ | ११०२९७ | २१०९०६० | २४००२९० | ९३१३१२५ |
| ३ | २०१६-१७ | १३००२३ | ४०२५७१० | ४३५८९९० | १६९१२८८१ |
| ४ | २०१७-१८ | १४८२५८ | ४१६९८०० | ४५९४१७० | १७८२५३८१ |
| ५ | २०१८-१९ | १७६९३४ | ४३६४४७० | ४८४७९८० | १८७१०१६२ |
| ६ | २०१९-२० | ८४१०७ | ४३०५६६० | ४६९८६२० | १८२०३६४६ |
| ७ | २०२०-२१ | ७९९२७ | ३१४४१७० | ४६७७४६० | १८१४८५४४ |
| ८ | २०२१-२२ | ८९४२१ | ३५८७१०० | ३९९०४९० | १५४८३१०१ |
| ९ | २०२२-२३ | १००५३५ | ३९९९९०० | ४४५५४९० | १७२८७३०१ |
| १० | २०२३-२४ | ९९४३१ | ३९८५७१० | ४८७०४६० | १८८९७३८४ |

संदर्भ : ईएसआयसी वार्षिक अहवाल, सन २०१४-१५ ते २०२३-२४.[५]

वरील तक्ता क्र. १ च्या आधारे असे दिसून येते की, २०१४-१५ मध्ये महाराष्ट्रातील ईएसआयसी अंतर्गत नोंदणीकृत नियोक्त्यांची संख्या १०३४९९ आहे, जी २०१८-१९ मध्ये वाढून १७६९३४ इतकी झाली. त्यानंतर २०१९-२० पासून नियोक्त्यांच्या संख्येत घट झाल्याचे दिसून येते. यामागे आर्थिक

GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 2
March - April: 2026

परिस्थिती, औद्योगिक बदल व कोविड-१९ महामारीसारख्या घटकांचा परिणाम दिसून येतो. २०२३-२४ मध्ये नियोक्त्यांची संख्या ९९४३१ इतकी नोंदविण्यात आली आहे.

कर्मचाऱ्यांच्या संख्येचा विचार केल्यास २०१४-१५ मध्ये २०५२४९० कर्मचारी ईएसआयसी अंतर्गत समाविष्ट आहेत. ही संख्या २०१८-१९ मध्ये वाढून ४३६४४७० इतकी झाली. २०२०-२१ मध्ये महामारीच्या काळात कर्मचारी संख्येत घट झाली असली तरी त्यानंतर पुन्हा वाढ होत २०२३-२४ मध्ये ३९८५७१० कर्मचारी नोंदणीकृत झाले आहेत.

विमाधारकांच्या संख्येतही कालावधीनुसार वाढ झाल्याचे दिसूनयेते. २०१४-१५ मध्ये २३५१८६० विमाधारक असताना २०२३-२४ मध्ये ही संख्या ४८७०४६० पर्यंत पोहोचली आहे. यावरून ईएसआयसी योजनेचा कामगार वर्गामध्ये वाढता स्वीकार स्पष्ट होतो.

लाभार्थींच्या संख्येचा विचार करता २०१४-१५ मध्ये ९१२५२१६ लाभार्थी आहेत. तर २०२३-२४ मध्ये ही संख्या वाढून १८८९७३८४ झाली आहे. यावरून विमाधारक कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांपर्यंतही ईएसआयसी योजनेचे सामाजिक सुरक्षा कवच प्रभावीपणे पोहोचल्याचे दिसून येते.

एकूणच २०१४-१५ ते २०२३-२४ या कालावधीत ईएसआयसी योजनेची व्याप्ती लक्षणीयरित्या वाढलेली दिसते. काही वर्षामध्ये नियोक्ते व कर्मचाऱ्यांच्या संख्येत चढ-उतार झाले असले तरी विमाधारक व लाभार्थ्यांच्या वाढत्या संख्येमुळे कामगारांच्या आरोग्य व सामाजिक सुरक्षा क्षेत्रात ईएसआयसी योजनेचे महत्त्व स्पष्ट होते.

**महाराष्ट्रातील ईएसआयसी अंतर्गत उपलब्ध वैद्यकीय सेवा-सुविधांची स्थिती (सन २०२४-२५) :**

महाराष्ट्रात कर्मचारी राज्य विमा महामंडळ अंतर्गत अंधेरी, बिबवेवाडी, कोल्हापूर येथे ईएसआयसी रुग्णालये, तर वरळी, कांदिवली, मुलुंड, ठाणे, वाशी, परेल, उल्हासनगर, चिंचवड, नागपूर, सोलापूर आणि नाशिक येथे ईएसआयएस रुग्णालये कार्यरत आहेत. कर्मचारी राज्य विमा योजना ही कामगार व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्य संरक्षण व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणारी महत्त्वपूर्ण सामाजिक सुरक्षा योजना आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी औषधालये, रुग्णालये, शाखा कार्यालये, प्रादेशिक कार्यालये, आयएमपी तसेच संलग्न टाय-अप रुग्णललयांच्या माध्यमातून आरागेय सेवा पुरविल्या जातात. महाराष्ट्र हे औद्योगिकदृष्ट्या प्रगत राज्य असल्याने येथे मोठ्या प्रमाणावर कामगार ईएसआयसी योजनेशी

GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 2
March - April: 2026

जोडलेले आहेत. प्रस्तुत तक्त्यामध्ये सन २०२४-२५ मध्ये महाराष्ट्रातील ईएसआयसी अंतर्गत उपलब्ध असलेल्या विविध वैद्यकीय सेवा-सुविधांची माहिती दर्शविण्यात आली आहे.

**तक्ता क्र. २ महाराष्ट्रातील वैद्यकीय सेवा सुविधा (२०२४-२०२५)**

| अ. क्र. | महाराष्ट्र वैद्यकीय सेवा सुविधा | २०२४-२५ |
|---|---|---|
| १ | औषधालय व शाखा कार्यालय | २३ |
| २ | औषधालय | ११२ |
| ३ | शाखा कार्यालय | ६९ |
| ४ | ईएसआयसी रुग्णालय (ESIC) | ३ |
| ५ | ईएसआयएस रुग्णालय (ESIS) | १२ |
| ६ | प्रादेशिक/उपप्रादेशिक कार्यालय | ७ |
| ७ | आयएमपी (IMP) | ५०८ |
| ८ | दुय्यम वैद्यकीय सेवा (टाय-अप रुग्णालय) | ३८७ |

संदर्भ : http://romaharashtra.esic.gov.in/ [६]

**आलेख क्र.१**



GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 2
March - April: 2026

वरील तक्ता क्र. २ व आलेखाच्या आधारे असे दिसून येते की, महाराष्ट्रात ईएसआयसी अंतर्गत विमाधारक कामगारांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी विविध स्तरावर आरोग्य सुविधांचे जाळे निर्माण करण्यात आले आहे. सन २०२४-२५ मध्ये राज्यात ११२ औषधालये आणि ६९ शाखा कार्यालये कार्यरत आहेत, तर औषधालय व शाखा कार्यालयांची संयुक्त संख्या २३ आहे.

रूग्णालयीन सुविधांचा विचार करता, महाराष्ट्रात ३ ईएसआयसी व १२ ईएसआयएस रुग्णालये कार्यरत आहेत. याशिवाय प्राथमिक व तज्ज्ञ वैद्यकीय सेवा पुरविण्यासाठी ५०८ आयएमपी तसेच ३७८ दुय्यम वैद्यकीय सेवा देणारी टाय-अप रुग्णालये उपलब्ध आहेत. यावरून ईएसआयसी योजनेअंतर्गत थेट रुग्णालयीन सुविधांसोबतच खाजगी संलग्न रुग्णालयांच्या माध्यमातूनही मोठ्या प्रमाणावर वैद्यकीय सेवा पुरविल्या जात असल्याचे दिसून येते.

एकूणच, महाराष्ट्रातील ईएसआयसी वैद्यकीय सेवा-सुविधांची रचना बहुस्तरीय असून, औषधोपचार, प्राथमिक आरोग्य सेवा, दुय्यम उपचार व रुग्णालयीन सुविधा यांचा समावेश आहे. उपलब्ध सुविधांमुळे विमाधारक कामगार व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्यविषयक संरक्षण मिळण्यास मदत होते. तथापि, लाभार्थ्यांची वाढती संख्या लक्षात घेता भविष्यात रुग्णालये व वैद्यकीय सुविधांचा आणखी विस्तार करणे आवश्यक आहे.

**ईएसआयसी अंतर्गत महाराष्ट्रातील दरडोई वैद्यकीय खर्चाची इतर राज्यांच्या तुलनेतील स्थिती :**

कर्मचारी राज्य विमा योजना अंतर्गत विमाधारक कामगार व त्यांच्या कुटुंबीयांना वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यासाठी होणारा दरडोई वैद्यकीय खर्च हा योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीचा महत्त्वपूर्ण निर्देशक मानला जातो. दरडोई खर्चाच्या आधारे एखाद्या राज्यामध्ये उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या वैद्यकीय सुविधांवरील आर्थिक गुंतवणूक, आरोग्य सेवांचा विस्तार व लाभार्थ्यांना मिळणाऱ्या सुविधांचे मूल्यांकन करता येते. प्रस्तुत तक्त्यामध्ये ईएसआयसी वार्षिक अहवाल २०१४-१५ ते २०२३-२४ नुसार विविध राज्यांमधील वैद्यकीय सेवेवरील दरडोई खर्च व क्रमवारी दर्शविण्यात आली आहे. या आधारे महाराष्ट्ररतील वैद्यकीय खर्चाची स्थिती इतर राज्यांच्या तुलनेत स्पष्ट होते.

GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 2
March - April: 2026

**तक्ता क्र. ३ राज्यानिहाय वैद्यकीय सेवेवर झालेला दरडोई खर्च (२०१४-१५ ते २०२३-२४)**

| अ.क्र. | राज्य | २०१४-१५ | क्रम | राज्य | २०२३-२४ | क्रम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | आंध्र प्रदेश | ६४७१ | १ | केरळ | ७११४ | १ |
| २ | आसाम | ५४९५ | २ | आसाम | ५३५६ | २ |
| ३ | केरळ | ४०६७ | ३ | पश्चिम बंगाल | ४८७३ | ३ |
| ४ | पश्चिम बंगाल | ४०३२ | ४ | हरियाणा | ४७५३ | ४ |
| ५ | कर्नाटक | ३८०५ | ५ | मिझोरम | ४५०३ | ५ |
| ६ | चंदीगड | ३५४४ | ६ | कर्नाटक | ४४३४ | ६ |
| ७ | मेघालय | ३११३ | ७ | सिक्कीम | ४२७७ | ७ |
| ८ | मध्यप्रदेश | ३०३० | ९ | तेलंगणा | ४१०८ | ९ |
| ९ | बिहार | ३०१२ | १० | चंदीगड | ३६६० | १० |
| १० | सिक्कीम | २९५६ | ११ | भारत | ३६२४ | ११ |
| ११ | भारत | २८६६ | १२ | महाराष्ट्र | २१२३ | २७ |
| १२ | महाराष्ट्र | ११९३ | २६ | | | |

संदर्भ : ईएसआयसी वार्षिक अहवाल, २०१३-१४ ते २०२३-२४.[७]

वरील तक्ता क्र. ३ च्या आधारे असे दिसून येते की, सन २०१४-१५ मध्ये वैद्यकीय सेवेवरील दरडोई खर्चाच्या बाबतीत आंध्रप्रदेश हे राज्य प्रथम क्रमांकावर आहे. या राज्यामध्ये दरडोई खर्च रु.६४७१ इतका आहे. त्यानंतर आसाम (रु.५४९५), केरळ (रु.४०६७), पश्चिम बंगार (रु.४०३२) या राज्यांचा क्रमांक लागतो. या कालावधीत भारताचा सरासरी दरडोई वैद्यकीय खर्च रु.२८६६ आहे. तर महाराष्ट्राचा खर्च केवळ ११९३ इतका असून महाराष्ट्र २६ व्या क्रमांकावर आहे.

सन २०२३-२४ मध्ये वैद्यकीय सेवावरील दरडोई खर्चाच्या स्थितीत काही बदल झाल्याचे दिसून येते. या वर्षी केरळ राज्य रु.७११४ दरडोई खर्चासह प्रथम क्रमांकावर आहे. त्यानंतर आसाम (रु.५३५६), पश्चिम बंगाल (रु.४८७३), हरियाणा (रु.४७५३), मिझोरम (रु.४५०३), या राज्यांचा क्रमांक लागतो.

GYANBODH
An International Multidisciplinary Peer Reviewed Journal
ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 2
March - April: 2026

भारताचा सरासरी दरडोई वैद्यकीय खर्च रु.३६२४ इतका असताना महाराष्ट्राचा दरडोई खर्च रु.२१२३ इतका असून महाराष्ट्र २७ व्या क्रमांकावर आहे.

तुलनात्मक अभ्यास करता असे दिसून येते की, २०१४-१५ ते २०२३-२४ या कालावधीत महाराष्ट्रातील दरडोई वैद्यकीय खर्चात वाढ झाली आहे. मात्र इतर अनेक राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्राची क्रमवारी मागे राहिली आहे. २०१४-१५ मध्ये रु.११९३ असलेला खर्च २०२३-२४ मध्ये रु.२१२३ पर्यंत वाढला, तरीही तो राष्ट्रीय सरासरीपेक्षा कमी आहे. यावरून महाराष्ट्रात ईएसआयसी अंतर्गत वैद्यकीय सेवांचा विस्तार झालेला असला तरी दरडोई आरोग्य खर्च वाढविण्याची आवश्यकता असल्याचे दिसून येते.

एकूणच तक्त्यातील आकडेवारीवरून केरळ, आसाम, पश्चिम बंगाल यासारख्या राज्यांनी वैद्यकीय सेवेवरील दरडोई खर्चामध्ये आघाडी घेतल्याचे दिसते. तर महाराष्ट्राने खर्चात वाढ नोंदविली असली तरी राष्ट्रीय पातळीवरील तुलनेत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे.

**दुय्यम सामग्री :**

प्रकाशित व अप्रकाशित कागदपत्रे, अहवाल, पुस्तक, वेबसाईट, नियतकालिके इत्यादींमधून संकलित केलेली माहिती ही दुय्यम स्त्रोत मानली जाते. या स्त्रोतांद्वारे संशोदकाला संशोधन समस्येशी संबंधित महत्त्वपूर्ण तथ्ये व आकडेवारी उपलब्ध होते. या माहितीची निर्मिती संशोधकाने स्वत: केलेली नसून ती इतर व्यक्ती, संस्था किंवा शासनाने संकलित व प्रकाशित केलेली असते. प्रस्तुत संशोधनात आवश्यक तथ्ये व माहिती संकलित करून त्याचा संशोधनाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी उपयोग करण्यात आला असून त्यासाठी विविध दुय्यम सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे.

**निष्कर्ष :**

ईएसआयसी योजना महाराष्ट्रातील संघटित क्षेत्रातील कामगार आणि त्यांच्या कुटुंबियांसाठी आरोग्य संरक्षण आर्थिक आधार आणि सामाजिक सुरक्षेचे एक अत्यंत महत्त्वाचे माध्यम आहे. आर्थिक चढ उतार आणि कोविड-१९ च्या साथीनंतरही नोंदणीकृत नियोक्ते, कर्मचारी, विमाधारक आणि लाभार्थ्यांच्या संख्येत सातत्याने वाढ झाली आहे. आजारपण लाभ (सामान्य, विस्तारीत, वर्धित) आणि अंत्यसंस्कार खर्च यासारख्या सुविधांमुळे कामगारांना आणीबाणीच्या काळात मोठा आर्थिक आधार मिळतो. २०१४-१५ च्या तुलनेत २०२३-२४ मध्ये वैद्यकीय सेवेवरील दरडोई खर्चात वाढ झाली असली तरी तो राष्ट्रीय सरासरी आणि इतर प्रगत राज्यांपेक्षा कमी आहे. राज्यभरात औषधालये, रुग्णालये आणि टाय-अप रुग्णालयांद्वारे

GYANBODH
An International Multidisciplinary
Peer Reviewed Journal

ISSN:3048-9792
Volume: 3
Issue: 2
March - April: 2026

आरोग्य सेवा दिली जात आहे. मात्र वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात वैद्यकीय सुविधांची गुणवत्ता कार्यक्षमता आणि विस्तार वाढविणे अत्यंत गरजेचे आहे.

**संदर्भसूची :**

१) देशमुख प्रभाकर (१९८७), श्रमाचे अर्थशास्त्र, विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.क्र. २१५.

२) काळकुंडे एस. के. (२०१०), कर्मचारी राज्य विमा योजना, ऐतिहासिक आणि प्रशासकीय दृष्टीकोन, साहित्य प्रकाशन, नागपूर.

३) पुरी एस. डी. (२०१७), कर्मचारी राज्य विमा कायदा, १९४८, स्नो व्हाईट प्रकाशन, पृ.क्र. xix

४) कर्मचारी राज्य विमा महामंडळ अधिकृत संकेतस्थळ : https://www/esic/nic.in

5) कर्मचारी राज्य विमा महामंहळ Statistical Abstract/ESIC ststistics, २०१३-१४ ते २०२३-२४, नवी दिल्ली.

६) कामगार राज्य विमा योजना, प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र https://romaharashtra.esic.gov.in

7) कर्मचारी राज्य विमा महामंडळ, भारत सरकार, वार्षिक अहवाल, २०१३-१४ ते २०२३-२४, नवी दिल्ली.